ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

UGC Approved

# VIDYAWARTA

## *Special Issue.*


Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

**Interdisciplinary National Conference on**



## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018

# HISTORY AND SOCIOLOGY

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

**Arts, Commerce & Science College, Ashti, Dist.Beed**

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

---

**Organized by**

# One Day Interdisciplinary National Conference on

# Recent Trends in Social Sciences and Commerce

**Tuesday, 27th February, 2018**

<u>**Principal & Organizer**</u>

Dr. S.R. Nimbore

<u>**Convenors**</u>

Prof. D.P. Mundhe    Dr. S.M. Wandhare    Prof. R.S. Satbhai

**Published By**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**Limbaganesh, Dist.Beed**

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | बालकामगार समस्या | प्रा.वाळके बी.बी. | 84 |
| 25 | बालकामगार समस्या आणि उपाय | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 88 |
| 26 | भारतातील बालकामगार समस्या : कारणे व उपाय | प्रा.सिताराम के. मोगल<br>प्रा.भागवत द.गोरे | 92 |
| 27 | बालकामगार समस्या : कारणे आणि उपाय | प्रा. पेरके वैशाली शेषराव | 96 |
| 28 | *बालमजूरीचे निर्मूलन एक सामाजिक आव्हान* | *प्रा.डॉ. रेणुका द. बडवणे* | 99 |
| 29 | बालकामगार एक सामाजिक समस्या | प्रा.डॉ.आव्हाड बी.बी. | 102 |
| | **History** | | |
| 30 | Role of Womens in Indian Freedom Struggle | Dr Rajaram.R.Pimpalpalle | 105 |
| 31 | A Historiographical Survey: Women's in Indian History | Dr. B.K. Shep | 107 |
| 32 | Mahatma Jotirao Phule: A Philosopher & Maker of Modern Maharashtra | Mahesh S Jadhav | 110 |
| 33 | Dr. B.R. Ambedkar's Indian Constitution Legacy as the Maker of the Modern India | Mr. D. M. Randive | 113 |
| 34 | Netaji Subhashchandr Bose : Great Freedom Fighter | Mr. Sandip Haribhau Shirsath | 115 |
| 35 | Nomadic Tribes in India: a reflection on history of Masan Jogi | Priyanka Jadhav Pradnyasurya Hemchand Shende | 121 |
| 36 | Gandhi's Economic Thought | Prof. Ravi Subhashrao Satbhai | 126 |
| 37 | भारतीय क्रांतिकारी चळवळीमध्ये कल्पना दत्तचे योगदान | प्रा. डॉ. विजया साखरे | 132 |
| 38 | १८५७ च्या राष्ट्रीय उठावात बेगम जिनत महल आणि हजरत महल या मुस्लिम महिलांचे योगदान | डॉ.शेख हुसैन इमाम | 135 |
| 39 | भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रिया | डॉ.शिवाजी सोमला पवार | 138 |
| 40 | आधुनिक भारताच्या निर्मितीत पंडित नेहरूचे शैक्षणिक योगदान | प्रा. राजेसाहेब भोसले | 142 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण | प्रा. बोडके बालाजी रावसाहेब | 144 |
| 42 | भारतीय स्त्रियांच्या सामाजिक शैक्षणिक स्थितीचा ऐतिहासीक मागोवा | प्रा. डॉ. बिराजदार डी. एस. | 147 |
| 43 | आधुनिक भारताच्या इतिहासातील महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 150 |
| 44 | आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य चळवळीतील | प्रा. मोहन काळकुट | 15 |
| 45 | स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा ऐतिहासिक अभ्यास | प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी ड डॉ. राधाकृष्ण ल. जोशी | 155 |
| 46 | समाज सुधारक सावित्रीबाई फुले | प्रा.डॉ.सदाफुले डी.एल. | 157 |
| 47 | भारतातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप | प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी | 161 |

ISSN – 2319 9318

# छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण

**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब,**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव जि.बीड

देशाच्या आर्थिक जीवनात व्यापार उद्योगाचे महत्वपूर्ण स्थान आहे ते राष्ट्राच्या संपत्तीत भर घालतात. त्यामुळे व्यापार आणि व्यवसायाला प्रेरणा मिळणे आवश्यक आहे.मराठेकालीन अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. सर्वसाधारणपणे लोकांच्या गरजा कमी होत्या साधा पोषाख, साधी राहणी व साधे खानपान होते. ज्यासाठी फारसा खर्च लागणार नव्हता. परकीय प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या वर्णनावरून या गोष्टीला दुजोरा मिळतो. शिवाजी महाराजांच्या व्यापार धोरणाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, त्यांचे व्यापारधोरण आंतरराष्ट्रीय व्यापारास संरक्षण व प्रोत्साहन देणारे होते . त्यांनी युरोपमधील देशांना व्यापारास परवानगी दिल्यामुळे व्यापार वाढण्यास मदत झाल्याचे दिसून येते. ज्यामुळे व्यापार वाढण्यास मदत झाल्याचे दिसून येते. ज्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादित मालाला योग्य मोबदला मिळाला व एकही शेतकरी शिवकाळात आत्महत्या केल्याचे उल्लेख दिसून येत नाही.

मराठ्यांच्या इतिहासाचे शिवकाळ व पेशवेकाळ असे दोन भाग पडतात. सर्वसाधारणपणे १६३० ते १७०७ या काळाला 'शिवकाळ' असे म्हटले जाते तर १७०७ ते १८१८ या काळाला 'पेशवेकाळ' असे संबोधले जाते. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली.म्हणून या काळाला शिवकाळ असे म्हणतात. शिवाजी महाराजांनी या नवजात मराठी राज्याला आर्थिकदृष्ट्या सबल करण्याचा आटोकाट प्रयत्न केले होते. शेती, उद्योग व व्यापार यात सुधारणा करण्यासाठी राजांनी विविध धोरणाचा अवलंब केला होता. हे गृहित धरूण प्रस्तुत शोधनिबंध लिहिलेला आहे. शोधनिबंध लेखनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांना आधार घेतलेला आहे.

**बाजारपेठा -**

शिवकाळात खेडे स्वयंपूर्ण होते. आर्थिक जीवनाचा पाया शेती हा होता. शेतकऱ्यांनी घामांनी पिकवलेल्या मालाला योग्य मोबदला मिळण्यासाठी बाजारपेठेची स्थापना केली. "कसब्याच्या अथवा पेठेच्या गावात आठवड्यास बाजार भरत असे या बाजारासाठी दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदीसाठी पंचक्रोशीतील लोक येत असत. पेठेत दुकानदाराबरोबरच बाहेरूनही काही व्यापारी आपले दुकान गुंडाळून दुसऱ्या बाजारपेठेत जात. मात्र तेली, भाजी विके, चांभार, कोष्टी, विणकर, शिंपी, कला आदि व्यापाऱ्यांची दुकाने कायमस्वरूपी असत'.[१] कसबा हे मराठा कालखंडातील आठवडी बाजाराचे महत्वाचे ठिकाण होते. कसबा आठवडी बाजाराचे दिवस निरनिराळे असत यामुळे कारागिराला आपल्या वस्तू निरनिराळ्या ठिकाणी विकण्याची संधी मिळत असे. कसब्याच्या ठिकाणी पेठ असे.[२] यापेठेच्या वसाहतीची आणि विकासाची जबाबदारी शेटे या वतनदारावर असे. या पेठेत कायमस्वरूपी काही व्यापाऱ्यांची दुकाने असत. या कसब्याच्या ठिकाणी कापड, नारळ, सुपाऱ्या, लोणी, भाज्या, इ. वस्तू विकण्यासाठी येत असत. १८ व्या शतकात पुणे हे महत्वाचे शहर होते या शहरात गणेशपेठ, गंजपेठ, शनिवार पेठ, शुक्रवारपेठ, बुधवारपेठ, वेताळपेठ इ. पेठांची दाखले इतिहासात मिळतात.[३] या पेठातून अनेक वस्तूंची आयात व निर्यात होत असत. या पेठेची पुढे वसाहतीत रूपांतर झाल्याचे दिसते. जिजाऊच्या आज्ञेनुसार पुण्याजवळ बसविण्यात आलेल्या पेठेला पुढे जिजापुर या नावाने संबोधविण्यात येऊ लागले.[४]

पेठेच्या वसाहतीची आणि विकासाची जबाबदारी 'शेटे' वतनदाराकडे आणि पेठेचे हिशेब ठेवण्याचे काम महाजनकडे असे. शेटेच्या मदतीला वर्षाच्या करारावर काम करणारा एक 'बिडवई' नावाचा अधिकारी असे व्यापाऱ्यांना आपल्या पेठेकडे आकर्षित करून घेणे हे बिडवईचे मुख्य काम होते. तसेच व्यापारी सरकारची फसवणूक करणार नाही याची देखील देखरेख तो करित असे या व्यतिरिक्त कोतवाल, डबहलकी, पानसरकी, इ. अधिकाऱ्यांच्या उल्लेख शिवरायांच्या कागदपत्रात आढळतो.[५]

छ.शिवाजी महाराजांना व्यापाराशिवाय राज्य सुसंपन्न होणार नाही. याची खात्री होती म्हणून त्यांनी व्यापारवृद्धीकडे विशेष लक्ष पुरविले शिवरायांनी राजगड व रायगड या राजधानी किल्ल्यावर बाजारपेठ बसविले रायगडावरील बाजारपेठांचे अवशेष पहाता सरदारला घोड्यावरून खाली न उतरता माल खरेदी करता यावा म्हणून दुकानाची जोती उंच केलेली दिसते.

ISSN – 2319 9318

**व्यापारी बंदरे व केंद्रे -**

शिवकाळात गजबजलेली व्यापारी बंदरे व केंद्रे होती. फॅक्टरी रेकॉर्ड्स मध्ये चौल,दाभोळ,कल्याण,भिवंडी,वेंगुर्ला,पेण,डहाणू,तारापूर केळवे, माहिम, आगाशी,कुडाळ,राजापूर,वसई बांदे, नागोठाणे, जैतापुर, खारेपाटण ही व्यापारी बंदरे होती व ती व्यापारासाठी प्रसिद्ध होती.[६] मराठा कालखंडात जहाजबांधणी उद्योगाला प्रोत्साहन शिवरायांनी दिले व समुद्रपर्यटनबंदीची धर्माची बंदी मोडली आणि जहाजांची व आरमारांची उभारणी केली यामुळे व्यापार, मत्सोद्योग व मीठोद्योगाचा विकास झाला.

**व्यापारी मार्ग :-**

मराठा कालखंडात व्यापार हा जलमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने आणि घाटमार्गाने होत असत. स्वराज्याचे प्रमुख दोन भाग होते. कोकण व देश. कोकणात ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, बाणकोट, हर्णे, देवगड, दाभोळ, राजापूर, वेंगुर्ले व मालवण ही पश्चिम बंदरे वाहतुकीसाठी प्रसिद्ध होती. महाराष्ट्र आणि कोकण या दोन नैसर्गिक विभागांना जोडणारे अनेक घाटमार्ग होते. नानेघाट,थळघाट,खंडाळाघाट, अंबाघाट, फोंडाघाट, अंबोलीघाट इ. घाट शिवकाळात नित्याच्या वापरासाठी होते. घाटमार्गावरील वाहतूकीचे नियंत्रण करणे तो सुरक्षित ठेवणे यासाठी घाटपांडे नावाचा अधिकारी असे.[७] घाटातील जकात वसूली करण्यासाठी मुतालीक घाटपांडेला मदत करत असे. १७ व्या शतकात महाराष्ट्राच्या काही भागातून जाणारा बऱ्हाणपूर ते गोवळकोंडा हा महत्वाचा मार्ग होता. खुष्कीच्या मार्गाने केली जाणारी वाहतूक सोपी होती. पेशवेकाळात पुण्याहून काशीला गेल्याची नोंद आहे. मिरज, काशी, सातारा,ग्वालेर, पुणे, दिल्ली, या मार्गाचा उल्लेख येतो. अंतर मोजण्याचे कोस हे परिमाण होते.

**वाहतुकीची साधने :-**

शिवकाळात वाहतुकीची प्रमुख साधने म्हणजे बैल, उंट, तट्टू, गाढव, रेडा, बैलगाडी, पालखी, नावा, जहाजही होती. तसेच छोटी-मोठी ओझी स्त्री-पुरूष खांद्यावरून अथवा आपल्या डोक्यावरून वाहून नेत. कंपनीच्या ताब्यातील बंदराकडून माल आपल्या बंदराकडे नेण्यासाठी शिवाजी महाराजांनी खास जहाजे बांधली होती.[८] त्याकाळात टपालाची व्यवस्था असल्याचेही आढळते. सरकार आपली पत्रे वाटण्यासाठी 'हरकारे' नेमत असत. एका गावाहून दुसऱ्या गावात पत्रे नेण्याचे काम ते करत. रायगड ते मुंबई हे सुमारे १२५ मैलाचे अंतर काटून जाण्यास शिवाजी राजाच्या एका हरकाऱ्याला पाच दिवस लागले. असा एका पत्रात उल्लेख आहे. खाजगी व्यापारी पत्रे याच पद्धतीने पाठविले जाई. गावचे टपाल तालुक्याला पोचविण्याचे काम महार करीत असे.[९]

**व्यापारी करव्यवस्था :-**

व्यापारातून जकात वसूली केली जात असे व त्यातून राज्याच्या सोयी सुविधा करीत असे. घाटमार्गावर व व्यापारी मार्गावर चौक्या बसविल्या जात असे व जकात वसुली केली जात असे. घाटपांडे हा जकात वसुली करीत व त्याला पत्की, डांगी, पानसरे, पथकदार, मोडबी, मेटकरी, हे सेवक घाटपांड्याला जकात वसुली व घाटमार्गाचे रक्षण करण्यास मदत करीत असत. १६७१ साली कुडाळचा सरसुभेदार नरहरी आंनदराऊ यास मिठावरील करासबंधी महाराजांनी जे पत्र लिहीले त्यात महाराज लिहीतात, "तुम्ही घाटी जकात जबर बैसविणे बार देशात मिठ विकते त्याचा हिशेब प्रभावळीकडे संगमेश्वराकडे मिठ विकते त्याने कित्येक जबर पडते ते मनास आणून त्या अजमासे जकाती जबर बैसवणे कि संगमेश्वरी विकले आणि घाट पावेतो जे बेरीज पडे त्या हिशेबे बारदेशाच्या मिठास जकाती घेवणे संगमेश्वराहुन बारदेशाचे मिठ महाग पडेल ऐसा जकातीचा तह देणे "[१०] यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचे मिठागराचे संरक्षण व करविषयक धोरण अभ्यासता येते.

**अंतर्गत व बाह्य व्यापार :-**

शिवकाळात अंतर्गत व्यापाराचे स्वरूप मर्यादित होते कारण खेडे हे स्वयंपूर्ण होते. तरीही अनेक बाजारपेठेची व मार्गाची निर्मिती केली. बाह्यव्यापार वाढविण्यावर भर दिला. त्यासाठी जहाजे बांधून आरमार उभारले व बंदरांची निर्मिती केली. महाराजांनी इंग्रजांना व्यापाराची परवानगी दिली, मात्र वसाहत स्थापन करण्यास विरोध केले. ते इंग्रजांचा उल्ल्ेख टोपीकर असा करीत व त्यांच्या पासून सावध राहण्याचा इशारा दिला त्यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

थोडक्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकीय क्रांती करीत असताना समाजाला कर्तव्याची जाणीव करून देवून समाज स्थैर्य आणण्याचे प्रयत्न केले. राज्यातील सावकार आणि व्यापार,उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्याचे,त्यांना विविध सोयी सवलती देण्याचे एक निश्चित धोरण होते. त्यांच्या व्यापार विषयक धोरणाबद्दल रामचंद्रपंत आमात्य आज्ञापत्रात सांगतात की, "साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा साहुकाराच्या योगाने राज्य अबादान होते न मिळेल त्या वस्तुजान राज्यात येतात ते राज्य श्रीमंत होते. पेठापेठात दुकाने, वखारी घालून हत्ती, घोडे, जरमिनाजरबान, परांभी आदिकरून वस्त्रजाम, रत्ने, शस्त्रे यांचा उदीम चालवावा "[११] म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांनी सावकार समुद्र पर्यटनबंदी, रोटीबंदी, यास विरोध करून शेतीपुरक व्यापारी धोरण आखले व त्यामुळे शेतकऱ्यांना व त्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळू लागला आणि नविन राज्य सुजलाम सुफलाम कसे होईल यासाठी जातीने कार्य केले. म्हणुन ते रयतेचे राजे व गोरगरीबांचे राज्य होते.म्हणुन त्यांच्या काळात सर्व जनता सुखी आणि संपन्न होती. अशाच धोरणाचा शेतकऱ्यांच्या संबंधात आजही निर्णय घेणे हि काळाची गरज ठरते.

**संदर्भ -**


१) डॉ.कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७ पृ.क्र.७४

२) गवळी पी.ए., मराठ्यांचा इतिहास, कैलास प्रकाशन,औरंगाबाद, पृ.क्र.२५९

३) उपरोक्त, पृ.क्र.२६०

४) आचार्य धनंजय, मराठी सत्तेचा उदय, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर, पृ.क्र.२६३

५) डॉ.कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७ पृ.क्र.७४-७५

६) गवळी पी.ए., मराठ्यांचा इतिहास, कैलास प्रकाशन,औरंगाबाद, पृ.क्र.२६०

७) उपरोक्त, पृ.क्र.२६२

८) डॉ.कुलकर्णी ए.आर., महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, डायमंड प्रकाशन,पुणे, २००० पृ.क्र.१७९

९) उपरोक्त, पृ.क्र.१८५

१०) कुलकर्णी अ.रा., अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, पुणे, २०००, पृ.क्र.५३

११) गवळी पी.ए., मराठ्यांचा इतिहास, कैलास प्रकाशन,औरंगाबाद, पृ.क्र.२५८

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| **History** | | | |
| 1 | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्रीयाः एक दृष्टिक्षेप | डॉ. भावना पाटोळे | 263 |
| 2 | जागतिकीकरण आणि मराठवाड्यातील ग्रामीण मराठा स्त्रीचे मागासलेपण व सद्यस्थितीचे आकलन | डॉ. सौ. गीतांजली भीमराव बोराडे | 266 |
| 3 | जागतिकीकरणात भारतीय शेती पुढील आव्हाने | प्रा.डी.एन.रिठे | 272 |
| 4 | "जागतिकीकरण आणि भारत" | श्री.फरताडे एस.बी , डॉ.बी.डी.जाधवर | 274 |
| 5 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत | 277 |
| 6 | "जागतिकीकरण आणि आदिवासी समुदाय " | श्री.सुरज यादव मुन | 279 |
| 7 | जागतिकीकरण एक आव्हान | प्रा. मोहन काळकुटे | 282 |
| 8 | जागतिकीकरणामुळे साहित्य लिखानात झालेले बदल एक ऐतिहासिक अभ्यास | डिगांबर राधाकिसन जाधव | 284 |
| 9 | जागतिकीकरण आणि दारिद्र्य निर्मुलनाचा इतिहास. | नितीन त्रिंबकराव क्षीरसागर | 287 |
| 10 | मराठवाडा आणि आदिवासी मन्नेवारलू जमात | प्रितम धोंडिबा टिळक<br>प्रा.डॉ.लक्ष्मीकांत जिरेवाड | 290 |
| 11 | जागतिकीकरण - एक संभ्रम | प्रा.बोडके बालाजी रावसाहेब | 292 |
| **Political Science** | | | |
| 1 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील | 296 |
| 2 | जागतिकीकरण आणि उपेक्षित घटक | प्रा.डॉ.रजनी अनंतराव बोरोळे | 299 |
| 3 | दहशतवादाचे जागतीक संकट | प्रा. डॉ. पुरी तात्या बाळकिसन | 303 |
| 4 | शेतकरी महिलांच्या समस्यांचा एक चिकित्यक अभ्यास | प्रा.जिजाराम श्रीकृष्ण बागल | 307 |
| 5 | जागतिकीकरण आणि बाजारवाद | प्रा.व्ही.एस.डोके | 309 |

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

# जागतिकीकरण - एक संभ्रम

**प्रा.बोडके बालाजी रावसाहेब**
*इतिहास विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव जि.बीड*

--------------(11)--------------

वेगवेगळ्या राज्यांच्या सरहद्दीत बंदिस्त न राहता जगातील मानवांनी एकत्र येणे हा जागतिकीकरणाचा अर्थ अभिप्रेत आहे. यात वावगे असे काही नाही आणि हि बाबा माणसासाठी नविनही नाही. अगदी प्राचीन काळी सुध्दा माणसे दूरदूरपर्यंत भटकंती करित. त्याकाळी प्रवास दुर्गम असूनसुध्दा भारतातील व्यापारी भारताबाहेर इराक,इराण,ग्रीक,अफगाणिस्तान,इंडोनेसिया,कलेशिया व श्रीलंका इ. दूरदूरच्या देशात भटकंती करीत, तसेच तिकडील व्यापारी इकडे भारतात येवून व्यापार करीत. ऐवढेच नव्हे तर त्यांच्यापेक्षा दूर असलेल्या पश्चिम युरोपीय देशांतील लोकही भूमार्गाने आणि जलमार्गाने भारतात येत. 'हे विश्वची माझे घर' मानण्याची भारतीयांची परंपरा प्राचीन आहे. विसाव्या शतकात जागतिकीकरणास अधिक वेग आला आहे. जगातील सर्वच राष्ट्रे या प्रक्रियेत आज सहभागी झाले आहेत. दळणवळणाची साधने वाढल्यामुळे जागतिकीकरणाला अधिक गती प्राप्त झाली. जगातील कोणतेही गरीब-श्रीमंत राष्ट्र जागतिकीकरणापासुन अलिप्त राहू शकत नाही. कारण आज ही संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची झाली आहे.

१९ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जागतिक अर्थव्यवस्था संघटित होण्यास सुरूवात झाली आणि विसाव्या शतकात दुसऱ्या महायुद्धानंतर खरी चालना मिळाली. जुलै १९४४ मध्ये ४० देशांच्या सदस्यांनी एकत्र येवून आंतरराष्ट्रीय नानेनिधीच्या निर्मितीसाठी न्यूहॅम्पेशायर येथे एकत्रित झाले आणि ब्रेटन वूड्स परिषदेनुसार आंतरराष्ट्रीय नानेनिधीची स्थापना करण्यात आली. यातून अमेरिका हे नविन शक्तीशाली राष्ट्र म्हणून उदयाला आले. अटलांटिक सनद, गॅट, डंकेल प्रस्ताव, अशियान, एपेक, नाफ्टा, युरोपीयन महासंघ, सार्क आणि डब्लू.टि.ओ. यातून जागतिकीकरणाची संकल्पना उदयाला आली. १९७१ ला निक्सन ने ब्रिटनवूड्स व्यवस्था संपूष्टात आणल्याची घोषणा केली त्यातून अनेक संकटे निर्माण झाली. तेल संकट, बाजारव्यवस्थेतील असंतूलन, औद्योगिक देशांच्या विकासदरात घसरण इ. संकटातून १९९० च्या नंतर जागतिकीकरणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. त्याचे काही चांगले व काही क्षेत्रावर वाईटही परिणाम झाले.

**जागतिकीकरणाची व्याख्या :-**

**स्मिथ :** जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय वाद आणि सर्वांसाठी स्वांतत्र्य या मूल्यांचा समावेश असणारी मुक्त व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे फायदे सर्वांना मिळवून देणारी सर्वसमावेशक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**एडवर्ड हार्वन :** जागतिकीकरण ही सिमापार उत्पादने, भांडवल, सेवा आणि आर्थिक क्रिया-प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष करणारी प्रक्रिया आहे.

**बायलिस व स्मिथ :** जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक,- सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**रूसी मोदी :** जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तु व सेवा यांची विक्री करणे होय.

**जागतिकीकरणाचे वैशिष्टे :-**

१) यंत्रयुगातील प्रगतीमुळे भौगोलिक दुरी संपुष्टात आली.
२) इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमातून जागतिक स्तरावर एक समान संस्कृती अस्तित्वात येत आहे.
३) जागतिकीकरणामुळे श्रमिक बाजार विश्वव्यापी स्वरूपाचा झाला.
४) मुक्तव्यापाराचा पुरस्कार
५) जागतिकीकरणात सरकारी नियंत्रणे रद्द केली जातात व सरकारी उपक्रमाचे खाजगीकरण केले जाते.
६) जागतिकीकरणात आयातीवरील निर्बंध हळू-हळू रद्द केले जातात व संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण केली जाते.

जागतिकीकरणाचे भारताच्या दृष्टिने फायदे :-

भारताला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावयाचे असेल तर भारताला सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करावे लागेल, परकिय गुंतवणुकीस मान्यता द्यावी लागेल, निर्यात वाढीसाठी विनिमय दरात सुधारणा करावी लागेल, पायाभूत सुविधांचा पुरवठा करावा लागेल, आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहचावे लागेल या गोष्टीची पुर्तता केली तरच जागतिकीकरणाचा लाभ भारताला होवू शकेल.

**फायदे :-**

- उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करता येईल.
- नव्या तंत्रज्ञान हस्तांतराचा लाभ घेता येईल.
- विविध प्रकारच्या बचती मिळतील.
- उद्योगातील कार्यक्षमतेत वाढ होईल.
- परकिय चलनाच्या साठ्यात वाढ होईल.
- रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व राहणीमानात सुधारणा होईल.
- शैक्षणिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण.

**तोटे :-**

- लघु उद्योगांना धोका.
- गरीब व श्रीमंत वर्गात विषमता.
- बेकारीत वाढ व बेरोजगारीचा प्रश्न.
- देशाच्या सार्वभौमत्वाला तडा.
- खाजगीकरणातून मक्तेदारी.
- जगातील सर्वात श्रीमंत १% लोकांचे उत्पादन जगातील ५७ % गरीब लोकांच्या उत्पन्नाएवढे आहे.

थोडक्यात 'खाऊजा' या धोरणामुळे भारतातील अनेक समस्या निर्माण होताना दिसून येत आहेत. शहराची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे भविष्यात जलसंपत्ती संकट ओढवणार आहे त्यासाठी जलसंपत्तीचे एकात्मिक नियोजन, विकास आणि व्यवस्थापन करणे नितांत गरजेचे आहे. जल संकटाबरोबर दारिद्र्यातही मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसून येत आहे. याचा सर्वात जास्त परिणाम शेती व शेतकरी यांच्यावर होताना दिसून येतो. आज शेतकऱ्यांना साधन सामृगीचा साठा उपलब्ध नसल्यामुळे निसर्गावर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी उत्पादनात घट होवून आत्महत्यासारखे प्रश्न निर्माण होत आहेत. जर जागतिकीकरणाचा आपणाला पुरेपुर फायदा घ्यायचा असेल तर शेतीला शाश्वत पाणी, शेतीतील तंत्रज्ञान, आधुनिक बि-बियाने, पुरक व्यवसाय व पायाभूत सुविधांची जोड दिली तर शेतकरी जागतिकीकरणात टिकू शकतो आणि सरकारला कर्जमाफी सारख्या समस्या सोडवायची गरज भासणार नाही. अन्यथा बोंडआळीसारख्या अनेक समस्यांना तोंड देवून शेतकरी उभारी घेणार नाही. व शेती-शेतकरी नष्ट होईल शेतीपुरक धोरण राबविणे हे सरकारचे कर्तव्य ठरते. जागतिकीकरणात जल, जंगल व जमिनीचे संरक्षण होणे ही गरजेचे आहे अन्यथा नैसर्गिक संतुलन बिघडू शकते आणि अनेक समस्या निर्माण होवू शकतात. मनुष्य जोपर्यंत नैसर्गिकरित्या जीवन जगत होता. तोपर्यंत निसर्गाचा समतोल देखील चांगला होता. निसर्गातील सर्व घटक मुबलक प्रमाणात पर्यावरणात अस्तित्वात होता. परंतु औद्योगिक क्रांती झाल्यानंतर तर मानवाने या पृथ्वीवर कहरच केला आहे. मानवांकडून निसर्गनियमांचे सर्वात जास्त उल्लंघन झाले आहे. प्रत्येक व्यक्ती व राष्ट्र स्वतः पुरताच विचार करत आहे. त्यामुळे निसर्गातील नैसर्गिकता नष्ट होवून त्याची जागा कृत्रिमतेने धारण केली आहे.

आज भारताने जागतिकीकरणाच्या माध्यमातून अनेक बाबतीत अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. देशात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झाले आहे. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात आपण प्रचंड प्रगती केली असताना देखील आज अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पाणी, वीज, रस्ते, मुलभूत सुविधा इ. सुविधा उपलब्ध करून देण्यास शासन अयशस्वी ठरत आहे आणि त्यांचे बळी शेतकरी, शेतमजुर, कामगार व गरीब वर्गांना जागतिकीकरणाचा फटका बसताना दिसून येत आहे.

**संदर्भ -**

१) डॉ.नलावडे पंडीत, आंतरराष्ट्रीय संबंध, कैलाश प्रकाशन औरंगाबाद २०१४
२) व्होरा राजेंद्र, भारतीय लोकशाही, डायमंड प्रकाशन पुणे २०१०
३) प्रा. रायखेलकर ए.आर., डॉ.दामजी बी.एच., भारतीय अर्थव्यवस्था, विद्या प्रकाशन औरंगाबाद २००३
४) शर्मा ओ.पी. , भारतीय अर्थव्यवस्था का वैश्वीक परिप्रेक्ष्य, सबलाइम प्रकाशन, जयपुर २००६
५) डॉ. देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, औरंगाबाद २०१४
६) डॉ.शिंदे ज.रा. व डॉ.अमृतकर प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २००६